# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना :-</u>** प्रभाग क्र. ९ अंतर्गत न्यु कॉलनी येथील सुरज आय हॉस्पीटल ते
**{सा.बां.वि. झोन क्र. १०}** गोंडवाना चौक पर्यंत रस्त्यांचे डांबरीकरण करण्याबाबत रू. ४६,८१,११४/- (रू. सेहचाळीस लक्ष एक्यांशी हजार एकशे चौदह फक्त) रकमेचे प्राकलन पद क्र. A२२००१३३०८०३ अंतर्गत विभागाव्दारे तयार केलेले आहे. सदर्हु रू. ४६,८१,११४/- रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच हे काम निविदा मागवुन हाती घेण्याचा तसेच पद क्र. A२२००१३३०८०३ अंतर्गत तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप : —

१. प्रस्तावित काम हे पद क्र. A२२००१३३०८०३ (पंडित दिनदयाल उपाध्याय अंर्तगत रस्ते सुधारणा कार्यकम) अंतर्गत प्रस्तावित असुन सदर्हु कामास सन २०२३-२४ च्या आर्थिक वर्षात, सदर्हु पदा अंतर्गत राशी रू. ४६,८१,११४/- चे प्रावधान प्राप्त आहे.
२. या कामास्तव मा. अधिक्षक अभियंता यांनी SE/PWD/T.S./३८/२०२३-२४ दि. ३०/०६/२०२३ अन्वये तांत्रीक मान्यता प्रदान केलेली आहे.
३. सविस्तर टिप्पणी नस्तीत आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :-** 485/**मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 08/08/2023

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंगळवारी झोन क्र. १० यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार प्रभाग क्र. ९ अंतर्गत न्यु कॉलनी येथील सुरज आय हॉस्पीटल ते गोंडवाना चौक पर्यंत रस्त्यांचे डांबरीकरण करण्याबाबत रू. ४६,८१,११४/- (रू. सेहचाळीस लक्ष एक्यांशी हजार एकशे चौदह फक्त) रकमेचे प्राकलन पद क्र. A२२००१३३०८०३ अंतर्गत विभागाव्दारे तयार केलेले आहे. सदर्हु रू. ४६,८१,११४/- रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच हे काम निविदा मागवुन हाती घेण्याचा तसेच पद क्र. A२२००१३३०८०३ अंतर्गत तरतूद मुक्त करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**